GRT

GOLDEN RESEARCH THOUGHTS


ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 9 | MARCH – 2017

# भाषा संस्कृती आणि भाषांतर

प्रा. डॉ. संजय कुलकर्णी
मराठी विभाग प्रमुख ,
जवाहर कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,
अणदूर, ता. तुळजापूर.

प्रस्तावना :

मानवाचे वैयक्तिक व सामाजिक जीवन ज्यामुळे इतर मानवांना जाणवते व काही अंशी समजते अशी भाषा ही एक सामान्य प्रवृत्ती आहे. दुसऱ्याला समजून घेणे, आपले विचार, मन, इच्छा दुसऱ्याला कळवणे, दुसऱ्यांशी सहकार्य करुन जगण्यातील अडचणी, प्रश्न सोडविणे इथपर्यंत जर मानवाचा बौध्दिक विकास झाला नसता, संघटित होऊन सुखाने सुरक्षित जगता येते हा शोध जर त्याला लागला नसता, तर समाज आणि भाषा याचा जन्मच झाला नसता. मानवाने केलेली प्रगती ही सर्व मानवजातीने एकत्र येऊन केलेली नाही. कारण भौगोलिक दृष्टिने मानवांचे जगाच्या अनेक भागात अनेक समुह होते. दुष्काळ, अवर्षण इत्यादी कारणांमुळे



सदैव एकाच ठिकाणी रहाणे त्याला अशक्य झाले आणि चरितार्थासाठी कराव्या लागणाऱ्या भ्रमंतीत त्याला इतर मानवसमुहांचा, प्रदेशांचा शोध लागला. या दोन समुहांच्या सवयी व गरजा वेगळ्या असतील. भाषा तर भिन्नच असणार म्हणून जरी जीवशास्त्रदृष्ट्या मानवात पुष्कळ साधर्म्य असले, तरी समूह म्हणून त्यातील प्रत्येकाची वैशिष्ट्ये होती. समुहजीवनाच्या सवयी होत्या. म्हणून एकत्र जीवन व्यतीत करताना ते कसे वागत होते. इकडे आपण लक्ष दिले पाहिजे. हा अभ्यास म्हणजे माणसाचा सामुहिक, सांस्कृतिक, सामाजिक अभ्यास होय. तो ज्या समाजाचा आहे. त्याच्या परंपरा, त्यातील लोकांचे गुणदोष, या समाजाचे अंतर्गत स्वरुप, इतर समाजांशी संबंध, या सर्व गोष्टीचा संबंध त्यात येतो. असाच प्रकार समाजातील प्रत्येक संस्थेचा असतो. भाषा ही अशा संस्थापैकी एक आहे. अशा संस्थाचा अभ्यास करताना तत्सम इतर परकीय संस्थांचा अभ्यास उपयोगी ठरतो. हा अभ्यास अनेक दृष्टिकोनातून करता येतो. समाजाच्या विनिमयाचे साधन या दृष्टीने भाषेचा अभ्यास हे एक सामाजिक शास्त्र आहे. आपल्या देशात अनेक प्रश्न आहेत. भाषा हा त्यातला एक प्रश्न आहे. म्हणून तिचे स्वरुप समजून घेणे आवश्यक आहे. भाषेच्या प्रश्नाला दोन बाजू आहेत. शास्त्रीय व व्यावहारिक किंवा सामाजिक, पहिली बाजू भावनावश न होता अभ्यासता येते. भाषेचे ध्वनी, त्यांचे वर्गीकरण, त्यांचा वापर, व्याकरण, संदर्भानुसार होणारी रुपे, तिच्यावर घडलेला इतर भाषांचा परिणाम इ. भाषेच्या वापरासंबंधीचा दृष्टिकोन वास्तववादी असला पाहिजे. ज्याप्रमाणे अज्ञान व अंधश्रध्दा दूर करण्यासाठी वास्तव दृष्टीची गरज आहे. त्याचप्रमाणे भाषेकडे पहाण्यासाठी, तिचा उपयोग आपल्याला जे सांगायचे आहे ते नीट सांगण्यासाठी सामाजिक दृष्टीची गरज आहे. मला जे जसे सांगावयाचे आहे, ते मी तसे सांगणार असे ज्या वेळी आपल्याला वाटेल त्याच वेळी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

भाषेचे खरे दर्शन घडेल. अशी भाषा संत तुकारामांनी वापरली आहे. संत रामदासांनी म्हटले आहे, 'भाषापालटे काही। अर्थ वाया जात नाही।' आणि तसेच त्यांनी लिहिले.

आपल्या देशात अतिशय प्रचलित असलेल्या शब्दात 'भाषा आणि संस्कृती' या दोन शब्दाचा नंबर बराच वर लागले. सामान्य माणसाच्या तोंडी हे शब्द एकसारखे असतात. त्यांचे स्पष्ट स्वरुप कोणाला कळलेले असो वा नसो. पण त्यांचा वापर मात्र लोकांकडून सर्रास होत असतो. दैनंदिन जीवनातल्या काही गोष्टी गृहीत धरुनच चालावे लागते. रुपयाची नोट हा नुसता कागद आहे, ही गोष्ट रोजच्या व्यवहारात आपल्याला लक्षात घ्यावी लागत नाही. आर्थिक व्यवहारासारख्या गोष्टीची शास्त्रीय आणि तात्विक पार्श्वभूमी ही समाजाची एक दीर्घकालीन सवय बनलेली असल्यामुळे आपण तिच्या बाबतीत अगदी निश्चिंत झालेले असतो. जीवनातील अनेक गोष्टींबाबत आपले वागणे असेच साचेबंद असते. भावनात्मक असते. या गोष्टीचा आपल्या मनाने स्वीकार केलेला असतो आणि त्यांना आपल्या सवयीत स्थान दिलेले असते.

भाषिक प्रश्नाबद्दल तर्कशुध्द आणि शास्त्रशुध्द विचार करायचा असेल तर आपला दृष्टीकोन अधिक सामाजिक आणि मानवी बनला पाहिजे, कारण या प्रश्नांचा योग्य विचार मानवी भावना ओळखून समाजाच्या सवयीचा अभ्यास करुन आणि परंपरागत समजुतीचे स्वरुप जाणून घेऊन होत असतो. भाषिक प्रश्न हे सामाजिक प्रश्न आहेत, जीवनविषयक प्रश्न आहेत. भाषेचे महत्त्व इतके आहे की, आज काही संदर्भात माणसाची व्याख्या 'बोलाणारा प्राणी' अशीच करणे योग्य ठरेल. भाषा ही समाजजीवनाला अपरिहार्य आहे याबद्दल वाद नाही. भाषा हा व्यक्तीव्यक्तीतला आणि व्यक्त आणि समाज यांच्यातला दुवा आहे. स्वतःचे व्यक्तीत्व इतरांच्या नरजेला आणून द्यायचे माणसाचे पहिल्या दर्जाचे साधन आहे. हे साहित्यात जितके खरे आहे तितकेच व्यवहरातही खरे आहे. वास्तव विश्व आणि व्यक्तिजीवन यांना ध्वनिरुप संकेतानी पुन्हा साकार करणारी भाषा ही एक शक्ती आहे. ध्वनिरुप प्रतिसृष्टी निर्माण करणारी ही शक्ती विनिमयासाठी वापरता येते. अशा रीतीने ज्या साधनांच्या आणि संस्थाच्या आधारे समाजजीवन चालले आहे. त्यांचा एक प्रमुख घटक बनते.

एकाच समाजात, म्हणजे सारखे संकेत वापरणाऱ्या एकाच परंपरेत जन्माला आलेल्या दोन व्यक्तींना जगाचे दर्शन अगदी वेगळे होऊ शकेल. उदा. रानात फिरताना मला नुसते पक्षी आणि नुसते झाडेच दिसतील, तर तिथे नेहमी राहणाऱ्या किंवा वन्य जीवनात रमलेल्या व्यक्तीला नुसते पक्षी म्हणून फारसा बोध होणार नाही. ती त्यांची नावे सांगेल, रंगरुप वर्णन करील. त्यांच्या सवयीबद्दल बोलेल, झाडाच्या पानाच्या आकृती, त्यांची फुले व फळे, ऋतुमानाप्रमाणे बदलणारे त्यांचे रंगरुप तुमच्यासमोर ठेवेल. कारण जीवनाच्या या भागात तिचा अनुभव अधिक निकटचा, म्हणून अधिक सुक्ष्म, विश्वासार्ह आणि जास्त काळजीपूर्वक पृथक्करण केलेला असणार. जसा आणि जितका अनुभव व्यक्तीला मिळतो. तसे त्याच्या अभिव्यक्तीचे साधन जी भाषा तिचे स्वरुप असते म्हणजेच ध्वनिरुप संकेत आणि त्यांची मांडणी ही व्यक्तीच्या मनाशी निघडीत असतात.

सर्वांना मान्य अशा जीवनातल्या आवश्यक सवयी म्हणजे संस्कृती. सवय म्हणजे कोणतीही गोष्ट एका विशिष्ट परिस्थितीत ठराविक प्रकारे करण्याची व्यक्तीची किंवा समाजाची प्रवृत्ती होय. ही प्रवृत्ती सर्व समाजाची असली तर आपण तिला परंपरा म्हणतो, रूढी म्हणतो. ज्याला आदर्श मानून समाजातील व्यक्तींनी वागले पाहिजे असे असते, त्याला संस्कृती म्हणता येईल. समाज व्यवस्थित चालण्यासाठी आखून दिलेल्या मार्ग न सोडता सर्वांनी चालावे अशी सर्वांची अपेक्षा असते. मग ती राजसत्ता असो किंवा इतर कोणत्या प्रकारची व्यवस्था असो. ही नियमबध्दता अनेक क्षेत्रात व्यक्त होते. उदा. पोशाखाचा विषय घेताला तर स्त्री–पुरुषांचे पोशाख तर वेगळे असतातच, पण घरातला आणि बाहेरचा, समारंभाच्या वेळचा, लग्न, व्यावसायिक कार्य, शोकप्रसंग इ. वेळीचा पोशाख वेगवेगळा असतो. जीवनात अनेक प्रकाराचे परिवर्तन होत असते. एका काळातील नियम दुसऱ्या काळा ग्राह्य ठरतीलच असे नाही. म्हणून संस्कृतीचे रुपही बदलत असते. सामाजिक मूल्य बदलतात. जीवनाच्या सवयी बदलतात. या सर्व परिवर्तनाचे चित्र भाषेतून प्रकट झाले पाहिजे. कारण जीवन आणि जीवनातले विशिष्ट रंग आणि प्रवृत्ती म्हणजे संस्कृती यांना व्यक्त स्वरुप देण्याचे काम भाषेला करावे लागते. या दृष्टिने भाषा ही संस्कृतिदर्शक ठरते. संस्कृतीबद्दल अभिमान



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

बाळगणारा आणि तिचा आविष्कार करणाऱ्या माध्यमाच्या सुरक्षितेबद्दल जागरुक असणारा वर्ग हा साधारणपणे पांढरपेक्षा बुध्दिजीवी वर्ग असतो. इतके महत्वाचे स्थान श्रमजीवी वर्गाच्या जीवनात असतेच असे नाही. भाषा ही केवळ शंभर टक्के संस्कृतिवाहनच असत नाही. कित्येकदा ती स्वतःच संस्कृतिचे एक अंग असते. प्रत्येक भाषा परिस्थितीच्या अनुरोधाने कशी वापरली पाहिजे याचे नियम आहेत. कोणते शब्द कोणत्या संदर्भात वापरावे, कोणी काय बोलावे, कुठे कसे बोलू नये, या बद्दल बहुतेक समाजात वेगवेगळ्या रूढी असतात. उदा. इंग्रजीत 'माय हज्बंड', 'माय फादर', असे म्हणतात. पण मराठीत समाजाच्या अनेक वर्गात 'माझा नवरा', 'माझा बाप', असे म्हणून चालणार नाही. ज्या व्यक्तीशी आपण बोलतो तिचा दर्जा सर्वनामाच्या रुपात प्रतिबिंबित करायची सवय इंग्रजी भाषेत नाही. मराठीत ती आहे. आदर, अपमान, उध्दटपणा, अडाणीपणा भाषेच्या या रूपातून व्यक्त होऊ शकतो म्हणून अशा भाषा वापरताना काळजी घ्यावी लागते.

भाषांतर करताना या गोष्टीचा अनुभव विशेष येतो. इंग्रजी 'यू' चे मराठी भाषांतर संदर्भपूर्वक 'तू', 'तुम्ही', 'आपण' असे करावे लागते. मराठीतल्या कित्येक पोटभाषात 'जा' या धातूचे आज्ञार्थी अनेकवचनी रुप 'जावा' असे होतो. नुसते 'जा' असे रुप वापरल्यास हा भेद माहित नसलेल्या व्यक्तीला अपमान झाला असे वाटणे स्वाभाविक आहे. इंग्लड आणि अमेरिका या दोन्ही देशात इंग्रजी भाषा बोलली जाते असे आपण म्हणतो. पण इंग्लडचे इंग्रजी अमेरिकेत किंवा अमेरिकेचे इंग्रजी इंग्लंडात वापरु लागल्यास अनेक अडचणी येतात. कारण बाह्यतः ध्वनिसाम्य असलेल्या अनेक संकेतामागील आशय पुष्कळदा भिन्न असतो. या दोन्ही देशातले जीवनप्रवाह भिन्न मार्गांनी गेलेले आहेत. म्हणून इंग्लिश माणसाला अमेरिकन इंग्रजी समजून घ्यावे लागते. म्हणजेच स्वतःला परिचित अशा संकेताचा वेश त्याला द्यावा लागतो. म्हणजेच भांषातर करावे लागते. याशिवाय प्रत्येक संस्कृतीला असलेले स्थलकालाचे बंधनही भाषेच्या अभ्यासकाला आणि भांषातरकर्त्यांला लक्षात ठेवावे लागते. पन्नास वर्षापूर्वीचे मराठी जीवन कल्पनाशक्तीने रेखाटता येणार नाही.

भाषांतर ही आंतरभाषिक आणि आंतरसांस्कृतिक वाङ्मयीन घटना असते. त्यामुळे भाषांतर हा तौलनिक साहित्याभ्यासाचा भाग ठरतो. भाषातंर करताना दोन भाषा, दोन काळ, दोन माध्यमे, दोन संस्कृती यांचा संबंध येत असतो. त्यामुळे भाषांतराच्या प्रक्रियेला मुळातच तौलनिक परिमाण लाभते. तौलनिक साहित्याभ्यासात भाषांतरकार अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. विशिष्ट साहित्यकृतीकडे आकर्षित झाल्यामुळे किंवा त्या साहित्यकृतीचे आपल्या भाषेत केलेले भाषांतर स्वभाषिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने तो भाषांतराकडे वळत असतो. निरनिराळ्या भाषा, देश आणि संस्कृती यावरील साहित्यकृतीच्या प्रभावाची वाट भाषांतराच्या वाहिनीतून जाते. म्हणून अभ्यासक प्रोबेर यांनी म्हटले आहे की, 'आंतरराष्ट्रीय प्रभावांना प्रवाहित करण्यासाठी महत्वपूर्ण मार्ग भाषांतर उपलब्ध करुन देत असते.' मूळ कृतीवर भाषांतर, अनुवाद, रुपांतर, संक्षेपकिरण, अर्वाचीनीकरण अशा वेगवेगळ्या प्रकाराने झालेल्या संस्करणाचा येथे विचार करता येतो. या संदर्भात वसंत आबाजी डहाके, यांनी मांडलेले मत विचारात घ्यावे लागते. ते लिहितात, 'तौलानिक साहित्याभ्यासात साहित्यकृतीचा विचार करताना भाषा, समाज आणि संस्कृती यांचा विचार अवश्य केला जातो. स्त्रोत भाषांतील साहित्यकृतीचा लक्ष भाषांतील साहित्यकृतीवरील प्रभाव लक्षात घेतला जातो. मात्र अनुवादाची प्रक्रिया, तिच्याशी असलेली भाषा, समाज व संस्कृती यांच्या संबधांचे विश्लेषण केले जात नाही. थोडक्यात, तौलनिक साहित्याभ्यासात भाषांतरीत कृतीचा समावेश असतो, परंतु कोणत्याही साहित्यकृतीच्या भाषांतराच्या प्रक्रियेचा विचार नसतो.

संदर्भ –

1. ना. गो. कालेलकर, भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुबंई, 1919
2. आनंद पाटील, तौलनिक साहित्य : नवे सिद्धात आणि उपयोजन, साकेत प्रकाशन, औरगांबाद, 1998
3. वसंत बापट, तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्वे आणि दिशा, मौज प्रकाशन, मुंबई, 1981



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

4. वसंत आबाजी डहाके, भाषांतरित वाङ्मयाची समीक्षा संपा–रमेश वरखेडे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक 1997

5. 'पंचधारा', एप्रिल ते जून 2013, मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, हैद्राबाद.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.